16-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/15/2025 10:46 PM Page 1

निवडक

नागेशी येथील सोमवार १४ रोजी श्री नागेश महारुद्राचा महारथोत्सव अगणित भक्तांच्या उपस्थितीत पार पडला. आपट्याच्या पेडाजवळ सुशोभित केलेल्या महारथाकडे श्री नागेश, श्री लक्ष्मी नारायण व श्री सिद्धीविनायकाच्या पालख्या नेल्यावर रथाची विधीवत पुजा करण्यात आली. त्यानंतर भक्तांनी रथाच्या चाकांवर नारळ फोडले व रथ ओढत सौंदेकर महाराजांच्या राजवाड्यासमोर नेण्यात आला. तिथे नागेशराजे सौंदेकरांनी पुजा केल्यावर भक्तांकडे फळे फेकणे व ती त्यांनी झेलण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर तिन्ही देवांना पालखीतून मंदिरात आणल्यावर प्रसाद वाटप करण्यात आले.

मोपा विमानतळावरील ब्लू टॅक्सी प काउंटर सुरूच

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १५ : मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील जीएमआर कंपनीने ब्लू टॅक्सी प काउंटर संघटनेने सेक्युरिटी क्लिअरन्स प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे १५ पासून काउंटर बंद करावा, अशी नोटीस संघटनेला १४ रोजी दिली होती. त्यानंतर लगेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक आमदार प्रवीण आर्लेकर यांच्याकडे संपर्क साधला. प्रवीण आर्लेकर यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे चर्चा केली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी थेट जी.एम.आर कंपनीकडे संपर्क करून यावर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यामुळे ब्लू टॅक्सी कॅप काउंटर कार्यरत राहिला परंतु केव्हातरी सेक्युरिटी क्लियरन्स प्रक्रिया संघटनेला पूर्ण करावीच लागणार आहे.

वाळवई येथील शांतादुर्गा देवीची उद्या वसंत पूजा

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. १५ : सातेरीभाट – वळवई येथील श्री शांतादुर्गा देवीची वसंत पूजा गुरुवारी दि. १७ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी देवस्थानात श्रीस अभिषेक व विविध धार्मिक विधी, दुपारी आरती, तीर्थप्रसाद, रात्री ९ वा. श्रींची पालखीतून प्राकाराभोवती मिरवणूक, १० वाजता दामोदर कामत सहपरिवार व महिला नाट्यसंघ निर्मित 'जय जय गौरीशंकर' हा महान पौराणिक संगीत नाट्यप्रयोग होणार आहे. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री शांतादुर्गा देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

समर्थ विद्यापीठ फोंडातर्फे २५ पासून बाल संस्कार शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

गुळेली, दि. १५ : श्री समर्थ विद्यापीठ फोंडा तर्फे बाल संस्कार शिबीर शिवोऽहम् याचे आयोजन करण्यात आले आहे.सदर शिबिर दि. २५ ते दि. २७ दरम्यान सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत, श्री केशवदेव मंदिर, फोंडा येथे होणार आहे. शिबिरात सहभागी होणारा वयोगट वय वर्ष १०ते १६ हा आहे. या शिबिरात मुलांना १२ ज्योतिर्लिंग विषयी सविस्तार माहिती त्याच बरोबर, विविध स्तोत्रे, खेळ, भजन, गोमंतकातील महत्वाची शिव देवालयांना भेट देण्यात येईल. भाग घेऊ इच्छूकांनी +९१९५१८३३२४५३ या क्रमांकावर संपर्क करावा असे आयोजकांनी केले आहे.

मडगाव भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १५ : मडगाव येथील कुडतरकर ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने दि. १७ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत कुडतरकर प्लाझा सहकारी संस्ता, बाल भवन, सत्यवती निवास, विशांत थियेटर, सिल्वर टॉवर सी आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे तेंबी डिटीसीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १७ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत तेंबी, न्यू मोंजन, आफ्रामेंत आणि मोडी तेंबी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

चिंचिणी फिडवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १५ : ११ केव्ही चिंचिणी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. १६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत सुकलदे, दुर्गा, न्यू दुर्गा, संतमोड्डी, बैदा, चिंचिणी बाजार, टेलिफोन एक्सचेंज भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे फोंडा येथील अंगारकी टी/सी आणि गंगानाथ टी/सीवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत हवेली पंचायत कुर्टीजवळ, सावईकर रुग्णालयाजवळ, वारखंडे आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

क्रीडा शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १५ : क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने क्रीडा शिष्यवृत्तीसाठी गोव्यातील तरुण पात्र खेळाडूंकडून अर्ज मागविले आहेत. आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी एकूण २५ शिष्यवृत्ती देण्यात येतील. २०२४–२५ या वर्षासाठी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेले, इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेणारे पात्र उमेदवार शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात. गेल्या वर्षी शिष्यवृत्ती मिळालेले अर्जदार या शिष्यवृत्तीसाठी पात्र नाहीत.अर्ज आणि इतर माहिती अर्जदारांनी खात्याच्या ुवीूर.सेर.सौंळ.ळप या वेबसाइटला भेट द्यावी आणि आपले अर्ज २५ एप्रिल २०२५ रोजी पर्यंत वळी–ीॉि.सेरपळल.ळप या ईमेल पत्त्यावर सादर करावे.

फोंडा भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. १५ : फोंडा सांताक्रूझ टी/सी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. १७ रोजी सकाळी ९ ते दुपारी २वाजेपर्यंत सांताक्रूझ, जेके टायर्स आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

कोमुनिदाद सुधारणा रखडल्या ; भागधारकांकडून नाराजी

मंजूर झालेल्या सुधारणा केवळ कागदापुरत्याच मर्यादित : प्रशासक कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १५ : गोव्यातील शतकानुशतके जुन्या कोमुनिदाद व्यवस्थेतील सुधारणा अद्यापही प्रत्यक्षात न उतरल्यामुळे भागधारकांनी शासनाच्या प्रशासकीय निष्क्रियतेवर आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये अधिवेशनात मंजूर झालेल्या सुधारणा केवळ कागदापुरत्याच मर्यादित राहिल्या असल्याचा आरोप कोमुनिदाद प्रतिनिधींनी केला आहे.

कोलवा आणि मडगाव कोमुनिदादचे भागधारक तसेच २०२४ च्या अधिवेशनासाठी स्थापन झालेल्या पाच सदस्यीय आयोगाचे सदस्य अविनाश तावरेस यांनी परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की , प्रलंबित फायलींचा मागोवा घेणे कठीण झाले आहे. प्रशासक कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता असून, अलीकडील सरकारी आश्वासनांमुळे कोणतीही ठोस कृती झाली नाही. त्यांनी स्पष्ट केले की निष्क्रिय कोमुनिदादच्या पुनरुज्जीवन, तसेच शेतीसाठी जमीन वापराशी संबंधित सुधारणा कागदावर मंजूर झाल्या असल्या, तरी प्रत्यक्षात काहीच घडलेले नाही.

राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात महसूल मंत्री मोन्सेरात यांनी विधानसभेत माहिती देताना सांगितले की, कोमुनिदाद कायद्यातील कलम ४१–अ, १८१–अ आणि ३१–अ अंतर्गत सुधारणा मंजूर करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासकीय पातळीवरील अंमलबजावणी आणि कायदेशीर बाबी उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे प्रगती अद्याप थांबलेली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या महिन्याच्या सुरुवातीला कोमुनिदाद अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, प्रशासकीय भरती गतीने करण्याचे, पूर्णवेळ प्रशासक नियुक्त करण्याचे आणि संपूर्ण प्रणालीचे संगणकीकरण करण्याचे आश्वासन दिले होते. १०० टक्के कोमुनिदाद सुव्यवस्थापन, जलद भरती व सर्व प्रक्रिया संगणकीकृत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले होते. त्यांनी उत्तर गोव्यातील ७५ कोमुनिदादींकडे विशेष लक्ष देण्याची गरजही व्यक्त केली.

मुख्यमंत्र्यांच्या या घोषणांवर प्रतिक्रिया देताना मडगाव, आके, दवरली आणि डिकरपाल या चारकोमुनिदादींचे अध्यक्ष आणि दक्षिण गोवा कोमुनिदाद फोरमचे सचिव सॅव्हियो जे. एफ. कोरिया यांनी सांगितले की, पूर्णवेळ प्रशासकांची नियुक्ती हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल असले तरी, प्रत्येक कोमुनिदाद साठी लिपिक भरती करताना त्या संस्थांची आर्थिक क्षमता विचारात घ्यावी लागेल. त्यांनी अलीकडील काळात दक्षिण गोव्यात आर्थिक ओझ्याचे परिणाम अनुभवले गेल्याचे नमूद केले.

संगणकीकरणाच्या दृष्टीने कोरिया यांनी स्पष्ट केले की, काही संपन्न कोमुनिदादी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्या तरी, सुधारित अंमलबजावणीसाठी कायदेशीर पाठबळ आणि कोमुनिदाद संहितेशी सुसंगतता आवश्यक आहे. मुख्यमंत्र्यांनी गेल्या वर्षी झालेल्या कोमुनिदाद अधिवेशनाच्या शिफारशींची अंमलबजावणी करून सुधारणा प्रक्रियेला मूर्त रूप द्यावे, असे त्यांनी सुचवले.

जानेवारी २०२४ मध्ये आयोजित अधिवेशनात राज्यातील तिन्ही झोनमधून प्रतिनिधींनी सहभागी होत १२ ठराव मंजूर केले होते. या ठरावांमध्ये बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई, प्रशासकांच्या निवडीत सुधारणा, अतिक्रमणाच्या नियमितीकरणाला विरोध, वकिलांच्या जबाबदारीची मागणी, समुदाय जमिनीचे पुनर्सर्वेक्षण आणि महिलांवरील भेदभाव नष्ट करणे यांचा समावेश होता.

या पार्श्वभूमीवर, कोमुनिदादच्या सन्मानार्थ 'कोमुनिदाद डे' म्हणून १५ एप्रिल दिनांक अधिकृतरित्या साजरा करावा, अशी मागणी दक्षिण गोवा कोमुनिदाद फोरमने सरकारकडे केली होती. सचिव (महसूल) यांना ३१ मार्च २०२५ रोजी सादर केलेल्या पत्रात, मडगाव कोमुनिदाद हॉलमध्ये कोणताही आर्थिक भार न आणता हा कार्यक्रम आयोजित करण्याची तयारी दर्शवण्यात आली. मात्र, अद्याप अधिकृत प्रतिसाद न मिळाल्याने भागधारकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

१५ एप्रिल हा दिवस १९६१ च्या लेजिस्लेटिव्ह डिप्लोमा क्रमांक २०७० चा वर्धापन दिन असून,कोमुनिदाद प्रणालीचे नियमन करणारा हा महत्त्वाचा कायदा आहे. हा दिवस भागधारक अनौपचारिकरीत्या गावकारी दिन' म्हणून साजरा करतात. मात्र, यंदा कोणताही अधिकृत कार्यक्रम न झाल्याने हा दिवस प्रशासकीय दुर्लक्षाचे प्रतीक ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

कोमुनिदाद जमिनीच्या रक्षणासाठी एकत्रित विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १५ : आसगाव गावातील कोमुनिदाद मालमत्तेत बेकायदेशीर कुंपण घालण्याच्या प्रयत्नाविरोधात स्थानिक रहिवाशांनी सोमवारी तीव्र संताप व्यक्त केला. शेकडो ग्रामस्थांनी घटनास्थळी एकत्र येत या भूमीचा विनाश होऊ दिला जाणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.

पंचायतीच्या अधिकाऱ्यांनी सकाळच्या सत्रात आसगावमधील कोमुनिदाद जमिनीवरील (सर्व्हे क्रमांक १०१/१) अनधिकृत कुंपणाची पाहणी केली. या वेळी अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि कोमुनिदाद पदाधिकारी उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी बेकायदेशीरपणे उभारण्यात येणाऱ्या सुमारे एक लाख चौरस मीटर क्षेत्रफळाच्या कुंपणाच्या विरोधात जोरदार आवाज उठवला.

आसगाव कोमुनिदादचे वकील नेल्सन फर्नांडिस यांनी याप्रकरणी सुदेश पार्सेकर या व्यक्तीचे नाव प्रमुख आरोपी म्हणून घेतले असून, या प्रकरणाची सुनावणी सध्या एसआयटीपुढे प्रलंबित आहे. फर्नांडिस यांनी सांगितले की, आरोपीविरोधात अटक वॉरंटही जारी करण्यात आले होते, मात्र तो आजवर अटक टाळण्यात यशस्वी ठरला आहे. कोमुनिदाद प्रशासन या स्थगितीला न्यायालयात आव्हान देण्याच्या तयारीत आहे.

या संपूर्ण प्रकरणाबाबत आसगावचे सरपंच हनुमंत नाईक, कोमुनिदाद कोषाध्यक्ष इयान डिसोझा, बीएमसी अध्यक्ष सायनोरा क्वाड्रोस, काँग्रेस नेते चंदन मांद्रेकर, तसेच सामाजिक कार्यकर्ते राजन घाटे आणि पार्वती नागवेकर आर्दीनी उपस्थित राहून विरोध दर्शवला. फर्नांडिस यांनी माध्यमांशी बोलताना आरोप केला की, पार्सेकर याला सत्ताधारी गटाकडून राजकीय पाठींबा असून, ही संपूर्ण जमीन नंतर दिल्लीतील एखाद्या गटाला विक्रीसाठी ठेवण्याचा डाव रचला जात आहे. कोमुनिदाद, पंचायत आणि स्थानिक जनता मिळून एक इंचही जमिन बळकावू देणार नाही, असे ते म्हणाले.

गेल्या विधानसभा अधिवेशनात हळदोणचे आमदार ॲड. कार्लोस फेरेरा यांनीही हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी त्यांनी २ लाख चौरस मीटर जमिनीचे वर्गीकरण रद्द करण्याच्या दुरुस्तीविरोधात आवाज उठवला होता. या मागणीला आसगाव बीएमसी अध्यक्ष सायनोरा क्वाड्रोस यांनीही तात्काळ पाठिंबा दर्शविला.

राजन घाटे यांनी आश्चर्य व्यक्त करत म्हटले की, मुख्यमंत्री याच प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन सभागृहात देऊनही अद्याप कृती न झाल्याने, सत्ताधारी पक्ष गोव्यातील जनतेची थट्टा करत आहे, असेच चित्र दिसते.या प्रकरणामुळे असंतोष वाढू नये म्हणून पोलिसांकडून घटनास्थळी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. फर्नांडिस यांनी सूचित केले की, जर असे बेकायदेशीर प्रयत्न थांबले नाहीत, तर स्थानिक लोकांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल. फर्नांडिस यांच्या मते, ही जमिन बळकावण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्यास आसगावमधील हिरवे जंगल आणि पर्यावरणीय संतुलन धोक्यात येईल.

मडगाव नगरपरिषदेच्या जीआयएस सर्वेक्षणाला अनियमिततेचा फटका

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १५ : मडगाव नगरपरिषदेने (एमएमसी) सुरू केलेल्या भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) सर्वेक्षणास सध्या अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांमुळे गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुसऱ्या व तिसऱ्या पक्षांना बेकायदेशीररित्या हस्तांतरित करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या मालमत्तांमुळे या मोहिमेचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनले आहे.अशा अडचणी असूनही, महसूल संकलन सुधारण्यासाठी व प्रशासकीय प्रक्रिया अधिक पारदर्शक बनवण्यासाठी ही मोहीम वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.

नगरपरिषदेकडून प्रथम सर्वेक्षण पूर्ण करण्यावर भर दिला जात असतानाच, काही नागरिकांनी यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, सुरुवातीच्या टप्प्यातच अनियमितता नोंदवून त्यावर तत्काळ कारवाई केल्यास संपूर्ण सर्वेक्षण अधिक परिणामकारक आणि विश्वासार्ह ठरू शकते. अन्यथा, याआधीप्रमाणेच या उपक्रमाचे भवितव्यही कागदावरच मर्यादित राहील, अशी चिंता व्यक्त करण्यात येत आहे. सध्याचे जीआयएस सर्वेक्षण चार वॉर्डांमध्ये सुरू असून त्याचा उद्देश व्यापारी परवाने, मालमत्ता कर आणि कचरा व्यवस्थापन शुल्काच्या संकलनात सुधारणा करणे हा आहे. विशेष म्हणजे, २०१५ मध्ये प्रभाग क्रमांक १४ मध्ये याच स्वरूपाचे सर्वेक्षण पार पडले होते. मात्र त्याचा अहवाल न केवळ अंमलात आणण्यात अपयशी ठरला, तर तो नंतर नगरपरिषदेच्या नोंदींमधूनही गायब झाला. महसूल गळतीबाबत गंभीर निरीक्षणे नोंदवणारा तो अहवाल जनतेच्या दबावामुळे चर्चेत आला होता आणि त्यावर तत्कालीन नगरविकास मंत्री विश्वजित राणे यांनी चौकशीचे आदेश दिले होते.

एमएमसीचे अधिकारी मेलवीन वाझ यांनी सांगितले की, काही अडचणी आहेत, परंतु सध्या आमचे मुख्य लक्ष सर्वेक्षण पूर्ण करण्यावर आहे. एकदा सर्वेक्षण पूर्ण झाले की, बेकायदेशीर आस्थापना तसेच परिषद मालकीच्या दुकाने अनधिकृतपणे हस्तांतरित झाल्याच्या प्रकरणांवर कारवाई केली जाईल.त्यांनी यावेळी स्पष्ट केले की, जीआयएस सर्वेक्षणामुळे अनधिकृत निवासी व व्यावसायिक मालमत्तांची नोंद करता येईल, ज्यामुळे महसूल संकलनात वाढ अपेक्षित आहे.

विशेष म्हणजे, २०१९ मध्ये एका खाजगी एजन्सीमार्फत करण्यात आलेल्या जीआयएस सर्वेक्षणातही कोट्यवधी रुपयांची संभाव्य महसूल गळती समोर आली होती. मुख्यतः न गोळा करण्यात आलेल्या व्यापारी परवाना शुल्कामुळे ही गळती झाली होती. मात्र या अहवालातील शिफारशीही याआधीप्रमाणेच दुर्लक्षितच राहिल्या. मडगावचे रहिवासी सॅव्हियो डायस यांनी यावर भाष्य करताना म्हटले की, एमएमसीकडून सर्वेक्षण हे नवीन नाही, परंतु त्या सर्वेक्षणाचे पुढे काय? याआधीही अनेक अहवाल केवळ धूळ खात पडून राहिले आहेत. यावेळी नगरपरिषदेतून ठोस कृती अपेक्षित आहे.

पंचायतीकडून ७९ अनधिकृत किऑस्क हटवण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १५ : गोवा खंडपीठाच्या आदेशानुसार, पेन्ह द फ्रान्स ग्रामपंचायतीने मालीम आणि पर्वरी परिसरातील ७९ अनधिकृत किऑस्क धारकांना नोटिसा बजावल्या असून, येत्या १५ एप्रिलपर्यंत स्वतः हून किऑस्क हटवण्याचे निर्देश दिले आहेत.

या ७९ अनधिकृत किऑस्कपैकी बहुतांश मालीम परिसरात असून, गेल्या अनेक वर्षांपासून सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय सुरू ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने २०१३ साली मालीम फिश जेट्टी परिसरात रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव सादर केला होता. या भागात सातत्याने होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, रहदारीचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी ही योजना आखण्यात आली होती.

सार्वजनिक बांधकाम विभागाने ११ जुलै २०१३ रोजी पेन्ह द फ्रान्स पंचायतीला पत्राद्वारे कळवले होते की, मालीम जेट्टीजवळील अरुंद रस्त्यांमुळे वाहनांची कोंडी होत असून, स्थानिक रहिवासी आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यानंतर पंचायतीने किऑस्क धारकांना नोटिसा पाठवून कारवाईचे संकेत दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत, त्यामुळे अनधिकृत किऑस्क आजही जागेवर कायम आहेत.

या भागातील काही किऑस्क स्थानिक पंचायत सदस्यांच्या समर्थनाने उभारण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विशेषतः डाएट केंद्राजवळ व बी.बी. बोरकर रस्त्यालगत अनेक किऑस्क उभारण्यात आले आहेत. काही वृत्तांनुसार, एका पंचायत सदस्याने थेट बी.बी. बोरकर मार्गावर तीन किऑस्क उभारले असून, स्थानिकांच्या तक्रारी असूनही त्यावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही.

दरम्यान, पर्वरी एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम आणि रस्त्यालगतच्या किऑस्कमुळे या भागातील वाहतूक समस्या अधिक गंभीर झाली आहे. गेल्या काही महिन्यांत बी.बी. बोरकर मार्गावरील वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.

साळ नदी प्रदूषण प्रकरण ; उच्च न्यायालयाची सुनावणी १० मेपर्यंत तहकूब

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १५ : नावेली येथील सालपे तलाव व साळ नदीच्या प्रदूषणासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेची (पीआयएल) सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने १० मेपर्यंत तहकूब केली आहे. या प्रकरणात, न्यायालयाने सर्व संबंधित सरकारी विभागांना मडगाव परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन जलदगतीने सुधारण्याचे आदेश दिले आहेत. सध्या सांडपाणी अनेक भागांतून नदीत जाऊन नाल्यांत मिसळत असल्याने पर्यावरणीय संकट निर्माण झाले आहे.

सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, विविध सरकारी यंत्रणांनी न्यायालयाला माहिती दिली की प्रलंबित उपाययोजना १५ मेपूर्वी पूर्ण केल्या जातील. मात्र, खंडपीठाने तात्पुरत्या उपाययोजनांवर समाधान न दर्शवता, दीर्घकालीन व शाश्वत उपायांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणाच्या

समन्वयासाठी स्थापन करण्यात आलेल्या कोअर कमिटीला अधिक परिणामकारक समन्वयासाठी तातडीने बोलाविण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

सुनावणीनंतर माध्यमांशी बोलताना, याचिकाकर्ते प्रा. अँटोनियो अल्वारेस यांनी कोअर कमिटीच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की ही समिती न्यायालयीन देखरेखीशिवाय कार्यरत असून, मडगाव नगरपरिषदेचे (एमएमसी) मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असूनही, त्यांना गेल्या वर्षभरात एकाही बैठकीसाठी पाचारण करण्यात आलेले नाही.

प्रा. अल्वारेस यांनी न्यायालयाकडे विनंती केली की स्वतंत्र समिती गठीत करावी आणि तिचे नेतृत्व मुख्य सचिवांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे असावे, जेणेकरून अधिक जबाबदारी व पारदर्शकता सुनिश्चित करता येईल. त्यांनी एमएमसीवरही टीका केली की, सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रश्नात सर्वसमावेशक व सुसंगत उपाययोजना राबविण्याऐवजी, केवळ तात्पुरत्या मार्गांनी कामकाज केले जात आहे.

त्यांनी नमूद केले की, ज्या भागांमध्ये अद्याप सांडपाणी वाहिन्यांची सुविधा उपलब्ध नाही, तेथील रहिवाशांना नोटिसा पाठवण्यात येत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाशी (पीडब्ल्यूडी) समन्वय साधण्याऐवजी डिस्कनेक्शनची धमकी दिली जात आहे. त्याचप्रमाणे, काही इमारतींना सांडपाणी जोडणीसाठी घरमालकांकडून एनओसी नाकारली जात असून, या समस्येकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

उच्च न्यायालयाची ही कारवाई २४ मार्च रोजी झालेल्या सुनावणीत उघड झालेल्या दीर्घकालीन प्रणालीगत अपयशांच्या पार्श्वभूमीवर आली आहे. यावेळी न्यायालयाने मडगाव नगरपरिषद, सांडपाणी पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एसआयडीसीजीएल) आणि दक्षिण गोवा नियोजन व विकास प्राधिकरण (एसजीपीडीए) यांच्यावर वर्षानुवर्षे झालेल्या निष्क्रियतेबद्दल तीव्र शब्दांत ताशेरे ओढले होते.

एसजीपीडीएने तात्पुरत्या स्वरूपात सोक पिट्स तयार करण्याचे आश्वासन दिले होते, तर एसआयडीसीजीएलने फातोर्डा मार्केट परिसरात १२० दिवसांत सांडपाणी नेटवर्क विकसित करण्याचे वचन दिले होते. तरीही मलभाट आणि कालकोंडा परिसरातील नागरिक आजही अपुरी सांडपाणी पायाभूत सुविधा आणि प्रशासनाच्या दंडात्मक कारवायांमध्ये अडकले आहेत.न्यायालयाची पुढील सुनावणी १० मे रोजी होणार असून, पर्यावरणीय सुरक्षेसाठी प्रभावी आणि दीर्घकालीन उपायांची गरज अधोरेखित झाली आहे.

मोरजी पंडिरवाडा येथे मिनी पुलाच्या जोड रस्त्याला डांबरीकरण करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १५ : मोरजी पंचायत क्षेत्रातील पंडिर वाडा या ठिकाणी जो जुना मिनी पूल होता. तो अत्यंत धोकादायक स्थितीत बनल्यानंतर गेल्या पावसाळ्यात या पुलाला गती देऊन नवीन पूल उभारण्यात आला. परंतु चतुर्थी नंतरही या पुलाच्या जोड रस्त्याला अजून पर्यंत डांबरीकरण न केल्यामुळे हा रस्ता धोकादायक बनला असून पावसाळ्यापूर्वी या जोड फुलाच्या रस्त्याचे डांबरीकरण करावे. अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पंडिरवाडा येथील जो मिनी पूल होता तो अत्यंत धोकादायक बनला होता. गेल्या पावसाळ्यात या पुलाची तातडीने नवीन पद्धतीने बांधकाम करण्यासाठी आमदार जीत आरोलकर मोरर्जी पंचायत मंडळांनी सरकार दरबारी प्रयत्न केल्यामुळे या पूलाला गती मिळाली आणि पूल चतुर्थी पूर्वी पूर्ण झाला होता. परंतु जोड रस्ता केला त्या रस्त्याला अजून पर्यंत डांबरीकरण का केले नाही? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहे. त्यामुळे या जोड रस्त्याला लवकरात लवकर डांबरीकरण करून लोकांची सोय करावी अशी मागणी स्थानिक नागरिक श्री फर्नांडिस यांनी केली आहे.